REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# चर्चचे (मंडळींचे) बारा प्रेषित आणि मंडळीची पायाभरणी

**वळवी विश्वास गोरखनाथ**
**संशोधक विद्यार्थी, सामाजिक शास्त्रे प्रशाळा विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.**

**सारांश :-**

ख्रिस्ती धर्मात येशु ख्रिस्ताच्या बारा शिष्यांना फार महत्त्व आहे. कारण ते मंडळींचा (चर्चचा) पाया रचणारे आणि स्थापक होते. ख्रिस्ताच्या स्वर्गरोहणानंतर पेत्राने यहुदी समाजात तर पॉल याने यहुदी समाजाबाहेर जागतिक ख्रिस्ताची सुवार्ता पोहचविली. ज्या रोमच्या सत्तेने पेत्राला क्रुसावर मारले, त्याच ठिकाणी आज जगातील सर्वात मोठे कॅथड्रीयल आहे. संत पॉलला माहित होते की, जर जेरुसालेमला गेलो तर माझी मृत्यू निश्चित आहे. तरी तो गेला आणि त्याचा तेथे शिरच्छेद करण्यात आला. योहान आपले आयुष्य पुर्ण जगला. पण छळवणुकीला थारा नाही. अतोनात कष्ट करुन त्याने ख्रिस्ती जीवन जगला आणि बायबलचे शेवटचे पुस्तक प्रकटीकरण लिहुन ख्रिस्ती धर्मासाठी मैलाचा दगड लावला. संत थोमा याने भारतात येऊन ख्रिस्ती धर्माची सुरुवात केली. तो भारतातच ख्रिस्ती हुतात्मा झाला. या बारा प्रेषितांचे जीवन म्हणजे आज जी आधुनिक ख्रिस्ती मंडळी उभी आहे, याच प्रेषितांच्या सांडलेल्या पवित्र रक्तावर बारा प्रेषितांच्या शिक्षणावर ख्रिस्त कोनशिला आहे मंडळीचा तर बारा प्रेषित मुख्य दगड, म्हणून ख्रिस्ती धर्म समजण्याअगोदर या बारा प्रेषितांना समजणे फार अगत्याचे आहे.

**बारा शिष्य :-**

प्रभु येशुची शिकवण त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या बारा शिष्यांनी वेगवेगळ्या प्रांतात जावुन सांगायला सुरुवात केली. विशेषकरुन जॉन आणि पितर यांनी सुरुवातीला ख्रिस्ती धर्म वाढविण्यास मोठा हातभार लावला. यहुदा याने प्रभु येशुचा विश्वासघात केल्याने आत्महत्या केली. त्याची जागा पुढे पॉल याने बारावा प्रेषित म्हणुन भरुन काढली. थोमा आणि बार्थालोर्मस हे भारतात आले आणि त्यांनी भारतात मिशनरी चळवळीला प्राचीन पाया घातला. पेत्र याने यहुदी समाज तर पॉल याने यहुदी समाजाबाहेर जाऊन म्हणजे आशिया, युरोपमध्ये वेगवेगळ्या जाती-जमाती तसेच राजनितीक क्षेत्रात ख्रिस्ताचार प्रसार केला. या प्रभु येशुच्या बारा शिष्यांचा (प्रेषितांचा) सविस्तर वृत्तांत पुढीलप्रमाणे -



**बारा प्रेषित**

| मत्तय. १०:२–४ | मार्क. ३:१६–१९ | लूक. ६:१४–१६ | प्रेषित. १:१३ |
|---|---|---|---|
| शिमोन पेत्र | शिमोन पेत्र | शिमोन पेत्र | शिमोन पेत्र |
| आंद्रिया | याकोब | आंद्रिया | योहान |
| याकोब | योहान | याकोब | याकोब |
| योहान | आंद्रिया | योहान | आंद्रिया |
| फिलिप्प | फिलिप्प | फिलिप्प | फिलिप्प |
| बर्थलमय | बर्थलमय | बर्थलमय | थोमा |
| थोमा | मत्तय | मत्तय | बर्थलमय |
| मत्तय | थोमा | थोमा | मत्तय |
| याकोब (अल्फीचा मुलगा) | याकोब (अल्फीचा मुलगा) | याकोब (अल्फीचा मुलगा) | याकोब (अल्फीचा मुलगा) |
| तद्दय[1] | तद्दय | शिमोन (जिलोत) | शिमोन (जिलोत) |
| शिमोन (कनानी)[2] | शिमोन (कनानी) | यहूदा (याकोबचा मुलगा) | यहूदा (याकोबचा मुलगा) |
| यहूदा इस्कर्योत | यहूदा इस्कर्योत | यहूदा इस्कर्योत | ------------- |

मत्तय व मार्क हे तद्दयचे नाव देतात तर लूक, त्याच्या दोन याद्यांमध्ये (लूक. ६ व प्रेषित. १) यहूदा (याकोबचा मुलगा) असे नाव देतो. काही जणांच्या मते यहूदा हे त्याचे मूळचे नाव असेल आणि नंतर त्याने तद्दय (अर्थ बहुधा ''कनवाळू'') असे नाव घेतले असावे. यहूदा इस्कर्योत ह्या नावाशी निगडीत असलेल्या कलंकामुळे त्याने आपल्या नावात बदल केला असावा.

''कनानी'' हे बहुधा ''आवेशी'' अशा अर्थाच्या अरॅमिक शब्दाचे भाषांतर असावे.

प्रेषितांच्या नावांच्या चारही याद्यांचा आरंभ शिमोन पेत्रच्या नावाने तर शेवट यहूदा इस्कर्योतच्या नावाने होतो (अपवाद प्रेषित. १ मधील यादी, कारण यहूदाने अगोदरच स्वत:ला संपवले होते) ही बाब लक्षणीय आहे. तसेच नावांची ही जंत्री चार-चारच्या गटाने दिली आहे. पेत्र, आंद्रिया, याकोब व योहान यांच्या नावांचा क्रम मागे-पुढे असला तरी ते नेहमीच पहिल्या गटात आहेत तर फिलिप्प, बर्थलमय, थोमा व मत्तय हे दुसऱ्या गटात आहेत. सर्व चारही गटात ही समानता पहायला मिळते.

सगळ्या म्हणजे चारही याद्यांमध्ये पहिल्या गटाचा प्रमुख पेत्र. दुसऱ्या गटाचा फिलिप्प तर याकोब (अल्फीचा मुलगा) तिसऱ्या गटाचा प्रमुख आहे. योहानकृत शुभवर्तमानामध्ये प्रेषितांच्या नावांचा यादी रुपाने उल्लेख नाही.

वरील तक्त्यात बारा प्रेषिताची नावे, बायबलमधील त्यांचा कार्यकाल आणि ख्रिस्ताने त्यांना दिलेली शिकवण यांचा सविस्तर उल्लेख आपल्या निदर्शनास येतो. ख्रिस्ताने जो महान आदेश प्रेषितांना दिला, तो म्हणजे 'मत्तय २८ : १९ ते २०' म्हणुन तुम्ही जा आणि राष्ट्रातील लोकांस शिष्य करा, पिता पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावाने बाप्तीष्मा द्या आणि जे काही मी तुम्हाला शिकविले आहे, ते त्या लोकांना पाळायला शिकवा आणि पहा, युगाच्या शेवटपर्यंत मी सदोदित तुमच्याबरोबर आहे. प्रेषित या महान आदेशाप्रती मृत्यूपर्यंत प्रामाणिक राहीला.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१. बारा प्रेषित खऱ्या अर्थाने मंडळीचा (चर्चचा) पाया रचणारे होते, हे दाखविणे.
२. पॉल याने अन्य जातीय समाजात म्हणजे यहुदी समाजाच्या बाहेर सर्वात मोठी मिशनरी चळवळ उभारली.
३. प्रेषित खऱ्या अर्थाने ख्रिस्ती धर्माचे हुतात्मे झाले.
४. पवित्र शास्त्र रचनेत या बारा प्रेषितांमधील काही प्रेषितांचा मोलाचा वाटा आहे, हे दाखविणे.

**बारा प्रेषितांची नेमणुक :-**

"Jesus called twelve men to be his followers (as described in mark ३:१३-१९) at first they are referred do as the twelve disciples from the latin version of the greek word Mathetes meaning learner or student. Laterly, after the establishment of belief in the resurrection of jesus, they are known as the apostles"[१] ग्रीक शब्द Mathetes म्हणजे शिकविणारा विद्यार्थी. प्रभु येशुची शिकवण याच बारा प्रेषितांनी लोकांना शिकविली आणि देवाचे राज्य स्थापन करुन ख्रिस्ती धर्मात मंडळींचा पाया घातला.

प्रभु येशुने संपुर्ण रात्रभर प्रार्थना केल्यावर सकाळी बारा प्रेषितांची नेमणुक केली "आणि दिवस उगवल्यावर त्याने आपल्या शिष्यांना आपल्याकडे बोलाविले आणि त्यांच्यातून बारा जणांना त्याने निवडले व त्यांना प्रेषित हे नाव दिले. शिमोन (येशुने त्याला पेत्र हेही नाव दिले) आणि त्याचा भाऊ अंद्रियास, याकोब आणि योहान, फिलीप्प आणि बर्थलमय, मत्तय आणि थोमा, अल्फीचा पुत्र याकोब व त्याला जिलोज असे म्हणत तो सिमोन आणि याकोबाचा पुत्र यहुदा व विश्वासघात करणारा यहुदा इस्कर्योत."[२] प्रभु येशुने बारा शिष्यांना प्रेषिताची पदवी दिली. प्रेषित म्हणजे देवाकडुन दर्शन प्राप्त करुन देवाची योजना प्रकट करणारा. पुढे याच शिष्यांनी संपुर्ण जगाला प्रभु येशुची शिकवण दिली, जिचे रुपांतर पुढे ख्रिस्ती धर्मात घडून आले.

**प्रेषित पेत्र :-**

पेत्र ज्याचा पितर देखील सांगितले जाते. सिमोन पेत्र प्रभु येशुच्या खुपच जवळ होता. सर्वात पहिले देवपुत्र असे येशुला त्यानेच म्हटले. प्रभु येशुने देखील पेत्राला मंडळयांचा पाया घालणारा म्हणुन जाहीर केले. "आणि मी तुला आणखी सांगतो, तु पेत्र आहेस. मी ह्या खडकावर माझ ी मंडळी उभारीन आणि अधोलोकांच्या वेशींना तिच्यावर जय मिळवता येणार नाही."[३]

पेत्र खऱ्या अर्थाने प्रभु येशुच्या या भविष्यवाणीवर खरा उतरला. यहुदी समाजामध्ये त्याने प्रभु येशुची मंहती मांडली आणि येशु हाच देवपुत्र आहे, ज्याची यहुदी समाज वाट पाहत होता आणि ज्याला तुम्ही क्रुसावर चढवून दिले, अशी सुवार्ता पेत्र यहुदी समाजात सांगू लागला. "म्हणुन इस्त्राएलच्या सगळ्या घराण्याने हे निश्चित समजावे की, तुम्ही ज्या येशूला वधस्तंभावर खिळले त्यालाच देवाने प्रभु आणि ख्रिस्त केले आणि हे ऐकल्यावर त्याच्या मनाला टोचणी लागली आणि ते पेत्रला व इतर प्रेषितांना म्हणाले, अहो बंधुंनो आता आम्ही काय करावे, तेव्हा पेत्र त्यांना म्हणाला, पश्चाताप करा आणि येशु ख्रिस्तांच्या नावाने तुम्ही, प्रत्येक जण, पापाच्या क्षमेसाठी बाप्तीस्मा घ्या आणि तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान मिळेल... तेव्हा ज्या लोकांनी त्याच्या वचनाचे स्वागत केले. त्यांचा बाप्तीस्मा झाला आणि सुमारे तीन हजार माणसे त्या दिवशी त्यांच्यात मिळाली."[४]



*प्रेषित पेत्र याचे कॅथिड्रल - सेंट पिटर्सबर्ग चर्च (रोम)*


ज्या पेत्राने प्रभु येशच्या मृत्यूवेळी तीनदा त्याचा नकार दिला. त्याच पेत्राने आज येरुसलेमच्या मंदीराच्या आवारात हे भाषण दिले आणि जवळजवळ तीन हजार लोकांनी त्याच्या वचनाचा स्विकार केला. याच लोकांपासुन पहिली प्रेषितीय मंडळी निर्माण झाली आणि पहिल्या मंडळीचा जन्म झाला. मंडळीचा खरा पाया पेत्र याने घातला.

"पीटर हा पुढे ख्रिस्त धर्माचा फार मोठा पुरस्कर्ता झाला. रोमचे सेंट पीटर्स चर्च हे त्याच्या नावाने उभारले गेले आहे. त्याच ठिकाणी पीटरला त्याच्या धर्म प्रसाराबद्दल क्रुसावर चढविण्यात आले."[५] पुढे मंडळी आणि ख्रिस्ती धर्माची धुरा संत पॉल याने स्विकारली आणि ख्रिस्ती धर्माला उंचीवर नेले.

"पीटर ईसा का शिष्य एवं महान धर्म प्रचारक था । उसने जेरुसलेम में एक गिरीजाघर तथा रोम में एक चर्च बनवाया... रोमन सम्राट निरो नें ६७ ई में उसे मृत्यूदंड दे दिया । उसकी कबर रोम के पास वेटीकन पहाडी पर स्थित है ।" प्लेट व जीन ड्रमण्ड ने लिखा है, "शहीदों का खुन ईसाई धर्म में बिज कहलाया ।"[६] प्रेषित पेत्राने जेरुसलेममध्ये मंडळींची स्थापना केली आहे. यहुदी लोकांना प्रभु येशु हाच मसिहा आहे. ज्याची तुम्ही वाट पाहत होते. ज्याने तुम्हाला देवाचे राज्य देण्याचा प्रयत्न केला. पण तुम्ही दैहिक राज्यमुक्तीची अभिलाषा बाळगुन होते. त्यामुळे ख्रिस्त तुम्हाला पावला नाही.

**प्रेषित पॉल :-**

संत पॉल हा सुरुवातीला ख्रिस्ती धर्माचा खुपच छळ करत होता. सुरुवातीला शौल म्हणुन ओळखला जाणारा शौल पुढे पौल म्हणुन ख्रिस्ती धर्माचा वाहक झाला. "शौल प्रवास करीत दिमिष्कजवळ आला असता त्याच्या सभोवती आकाशातुन अकस्मात एक प्रकाश चमकला आणि तो जमिनीवर पडला, तेव्हा त्याने एक आवाज ऐकला आणि तो आवाज त्याला म्हणाला शोल, शोल तु माझा छळ का करतोस, तेव्हा शौल म्हणाला प्रभु तु कोण आहेस आणि देव म्हणाला, तु ज्याचा छळ करतोस, तो येशु मी आहे."[७] प्रभु येशुने शौलला दर्शन देवून त्याचा पालट केला. ऐतिहासिक पध्दतीने शौलचा पालट कसा झाला, याची माहिती मिळत नाही, म्हणून बायबलचा आधार येथे घ्यावा लागतो. संत पॉल याने आपल्या जिवीत काळात तीन सुवार्ता फेऱ्या काढल्या. त्यात आशिया मायनर, ग्रीस, स्पेन, स्मुर्णा आणि लहान-लहान प्रांतात जावून प्रभू येशूची सुवार्ता दिली आणि वेगवेगळ्या स्थानिक मंडळींची स्थापना करीत आपले जीवन वाहिले. पॉल हा सर्व प्रेषितांमध्ये सर्वोच्च स्थान धारण करतो. पेत्र जेथे मंडळींची सुरुवात करतो, तेथे पॉल मंडळींना उंचीवर नेण्याचे काम करतो. पेत्र यहुदी समाजात सुवार्ताचे काम करतो तर पॉल यहुदी समाजाबाहेर म्हणजे परराष्ट्रात जावून वेगवेगळ्या मंडळींची स्थापना करतो. पॉल याने मिशनरी चळवळीचा पाया रचना. ख्रिस्ताची मंडळी पुढे याच प्रेषितांच्या पायावर उभी राहीली. ज्यात प्रेषित, प्रबोधक, उपदेशक, शिक्षक, सुवार्तिक, पाळक ही पदे मंडळीत ख्रिस्ताचे कार्य करणाऱ्या लोकांना दिली जात असे.




*प्रेषित पॉलच्या तीन सुवार्ता फेऱ्या*

संत पॉलला रोममध्ये कैदेत ठेवण्यात आले होते. प्रभु येशूसारखेच त्याला देखील येरुसलेममध्ये जीवाचा धोका होता. तरी देखील तो येरुसलेमला गेला आणि तेथे इ.सन ६८ मध्ये निरो या सम्राटच्या कालखंडात त्याच्या शिरच्छेद करण्यात आला.

"ईसा के शिष्य संत पालने अनेक कष्ट सहन करते हुए भी ईसाई धर्म का प्रसार किया। उसे ईसाई धर्म का दुसरा संस्थापक कहते है । सेवाईन ने लिखा है, पॉल एक महान संघटनकर्ता था । अपने प्रचार कार्य से उन्होंने इतनी विस्तृत ख्याती प्राप्त करली की, उन्हे ईसाई धर्म में द्वितीय संस्थापक कहा जाता है ।"[८] प्रेषित पॉल याने शिष्यत्वाबरोबरच एक आदर्श ख्रिस्ती प्रेषित, सुवार्तीक, उपदेशक यांची साबीती दिली होती. पॉलचे जीवनच ख्रिस्ती धर्म प्रचारासाठी संघर्षगाथा आहे. जी प्रत्येक ख्रिस्ती बांधवाला प्रेरणा देते. म्हणुन प्लेट आणि जीन ड्रमण्ड असे लिहीतात की, धर्मदूत पॉल प्रथम ईसाई धर्म प्रचारक था ।

**संत थोमा :-**

संत थोमा हा ख्रिस्ताच्या बारा शिष्यांपैकी एक होता. इ.स. ५२ मध्ये ख्रिस्ती धर्मप्रचारासाठी समुद्र प्रवास करुन तो भारतात आला. त्याने भारतात केरळमध्ये सात मंडळींची (चर्चची) स्थापना केली. "Traditionally Thomas is believed to have travelled outside the Roman Empire to preach the gospel, travelling as for as Tamilkam which are the states of Kerala and Tamil Nadu. In present day India According to Tradition, Thomas reached Muziris (Modern Day North Paravur and Kodungalloor in the State of Kerala, India) in AD 50 and baptized several people, founding what today are known as Saint Thomas Christians of mar Thoma Nazrains. After his death …. According to Syrian Christian Tradition, saint Thomas was allegedly killed at St.Thomas Mound in Chennai in 72 AD July 3$^{rd}$ and his body was interred in Mylapore. Ephrem the Syrian states that the Apostle was Martyred in India, and that his relics were tken to Edessa. This is the earlies know record of his Martyrdom."[९] संत थोमा याचा उल्लेख बायबलमध्ये मत्तय १० : १ : ४ मार्क ३ : १३ : १९ लुका ६ : १२ : १६ या अध्यायात येतो. संत थोमाला Doubting Thomas म्हटले जाते. ज्याने प्रभु येशुच्या पुनरुत्थानाच्या चळवळीत ख्रिस्ताच्या हाताला हात लावुन अविश्वास व्यक्त केला होता. पण पुढे जाऊन याच थॉमाने ख्रिस्ती धर्माची पताका रोवली. आज २ टक्केपेक्षा जास्त ख्रिस्ती लोकसंख्या भारतात आहे.

संत पेत्र आणि संत पॉल यांना सोडून बाकी प्रेषितांनीही ख्रिस्ती धर्माला मोठे योगदान दिलेले आहे. स्टीफन हा पहिला ख्रिस्ती हुतात्मा म्हणुन ओळखला गेला. "आणि ते स्टीफनला दगड मार करीत असता तो देवाच्या धावा करीत म्हणाला, देव पुत्र येशू माझ्या आत्म्याचा स्विकार कर."[१०] तसेच शमरोन नगरात जावून फिलीप्प याने प्रभु येशुची सुवार्ता दिली. फिलीप्प शमरोन नगरात गेला व त्याने तेथील रहिवाशांना ख्रिस्ताची घोषणा केली आणि त्या नगरात मोठा आनंद झाला. ज्यावेळी आपल्याला मनाची शांती लाभते, तेव्हाच आपण आनंद व्यक्त करतो. फिलीप्प याने संपुर्ण शमरोन नगरात ख्रिस्ताच्या नावाने दृष्टात्मे काढले तसेच रोग्यांना बरे केले आणि प्रभू येशू हाच मोक्ष देणारा आहे, असे

सांगितले. पुढे योहान याने शुभवर्तमान तसेच बायबलचे भविष्यसुचक पुस्तक प्रकटीकरण लिहीले. अशा प्रकारे सुरुवातीला बारा प्रेषितांनी मंडळींची सुरुवात करुन तिला परिपक्व केले.

"आंद्रीया (इं) - Andrew पोर्तु - आंद्रे. आंद्रिया हा पेत्राचा धाकटा भाऊ. हाच येशुचा पहिला शिष्य. गालील प्रांतातील बेथसदा गावाचा परंतु वास्तव्य कफर्णहुमात, मासे पकडणे हा त्याचा व्यवसाय, मासे पकडण्याऐवजी मी तुला माणसे पकडणारा बनवीन, असे म्हणुन येशुने त्याला पाचारण केले."[११] अशा प्रकारे ख्रिस्ताने आपला पहिल्या शिष्याचा प्रेषित म्हणुन अभिषेक केला. तसेच पुढे ख्रिस्ताने याकोब याची बारा प्रेषितात निवड केली.

"याकोब हा जब्दीचा मोठा पुत्र होता. त्याचे वडील सन्हेद्रीन म्हटलेल्या यहुदी धर्मसभेचे सभासद होते... बायबलच्या नव्या करारातील प्रेषिताची कृत्ये या पुस्तकाचा बारावा अध्यायात हेरोद राजाने याकोबाला तलवारीने मारले, असा उल्लेख आहे. याकोबाच्या शिरच्छेदाचे वर्ष इ.स. ४४ होते."[१२] योहान व याकोब यांची आई सलोमी ही येशुच्या आईची मावस बहीण होती. योहान हा बारा शिष्यांपैकी वयाने सर्वात लहान असल्याने तो येशुचा आवडता शिष्य होता.

"योहान हा याकोबचा धाकटा भाऊ... येशुची शिकवण कशी चुकीची आहे, हे सांगणारा गॉस्टीक नावाचा पंथ उदयास आला. या पंथाच्या पाखंडी मतांचे खंडण करण्यासाठी ख्रिस्ती लोक योहानला गळ घालू लागले. वृध्दापकाळात योहानने येशु चरित्र असलेले योगानकृत शुभ वर्तमान Gospel of John हे पाचवे पुस्तक लिहीले."[१३]

"मत्तय हा अल्फीचा पुत्र. कफर्णहुमचा रहीवासी. हा रोमन समा्रटाच्या जकातदाराचे काम करी. इतर शिष्यांच्या मानाने तो अधिक शिकलेला होता... मत्तयने इ.स. ४५ च्या सुमारास येशुची सुवार्ता सांगण्यासाठी पर्शिया (इराण), इथिओपिया आणि इजिप्त हे देश निवडले."[१४]

अशा प्रकारे पेत्र आणि पॉल सोबतच फिलीप, बर्थलमय, यहोदा, सिमोन कनानी यांनी देखील ख्रिस्ताच्या कार्याला पुढे नेण्याचे अतोनात प्रयत्न केले.

**बारा प्रेषितांचा मृत्यू :-**

"The biblical apostles were leaders of the early church standing in for jesus, seeing themselves as his delegates. Some of the apostles and early believers were martyrs (from the greek word Martyrion meaning witness) one who gave his or her life for the faith was a martyr... New testament were Stephen the deacon (Act ६-८) and James, the brother of John. (Act १२:२)"[१५] बारा प्रेषितांची मृत्यू वेगवेगळ्या प्रांतात झाली. रोमचा सम्राट निरोने प्रेषित पोलचा शिरच्छेद तर प्रेषित पेत्रला इ.स. ६४ मध्ये मृत्यूदंडाची शिक्षा दिली. तसेच डिकन स्टिफनला जेरुसलेममध्ये दगडमार करुन ठार केले.

| Sr. No. | Apostle | Date of Martyrdom |
|---|---|---|
| 1 | James | 44-45 A.D. |
| 2 | Peter | 64 A.D. |
| 3 | Andrew | 70 A.D. |
| 4 | Thomas | 70 A.D. |
| 5 | Philip | 54 A.D. |
| 6 | Mathew | 60-70 A.D. |
| 7 | Burtholomew | 70 A.D. |
| 8 | James the Lesser | 63 A.D. |
| 9 | Simon the Zealot | 74 A.D. |
| 10 | Judas Thaddeus | 72 A.D. |
| 11 | Mathias | 70 A.D. |
| 12 | John | 95 A.D. |
| 13 | Paul | 67 A.D. |

अशा प्रकारे बारा प्रेषितांनी ख्रिस्ती धर्माचा पाया पहिल्या सत्रात घातला आणि स्वत: वेगवेगळ्या मृत्यूला सामोरे जावून ख्रिश्चीयन मार्टीडम झाले.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**


१) youtube.com/watch.2V=9tahgGLGSuk&t=16953/studyIQ

२) A Pocket Guide to Christian History, Kevin O Donnell, Trafalger Square Publishing, Chicago, First Edition, Year – 2009, PP. 11.

३) मत्तय, १६:१८, बायबल.

४) प्रेषित्यांची कृत्ये, २ - ३६ ते ४१, बायबल.

५) विश्‍व का बृहत् इतिहास, एस.एल.नागोरी, कांता नागोरी, आर.बी.एस.पब्लिशर्स, जयपुर, प्रथम संस्करण, वर्ष २००९, पृष्ठ क्र. १६७.

६) ख्रिस्त, बुध्द आणि श्रीकृष्ण, डॉ.वि.रा.करंदीकर, स्नेहल प्रकाशन, पुणे, वर्ष ५ ऑक्टोबर, २००८, पृष्ठ क्र. ६९.

७) प्रेषित्यांची कृत्ये, ९ - ३ ते ५, बायबल.

८) प्रेषित्यांची कृत्ये, ७:५९, बायबल.

९) विश्‍व का बृहत् इतिहास, एस.एल.नागोरी, कांता नागोरी, आर.बी.एस.पब्लिशर्स, जयपुर, प्रथम संस्करण, वर्ष २००९, पृष्ठ क्र. १६६.

१०) http://en.wikipedia.org/wiki/thomas-the-apostle Thomas The Apostle, ०२/०१/२०१९, ११.३४ AM

११) मराठी ख्रिस्ती साहित्य : उगम आणि विकास, प्रा.डॉ.सुभाष पाटील, कुणाल हजेरी चेतक बुक्स प्रकाशक, पुणे, जानेवारी, २०१६, पृष्ठ क्र. १४.

१२) उपरोक्त, पृष्ठ क्र. १४-१५.

१३) उपरोक्त, पृष्ठ क्र. १५-१६.

१४) उपरोक्त, पृष्ठ क्र. १७-१८.

१५) A Pocket Guide to Christian History, Kevin O Donnell, Trafalger Square Publishing, Chicago, First Edition, Year – 2009, PP. 11.




**वळवी विश्‍वास गोरखनाथ**
**संशोधक विद्यार्थी, सामाजिक शास्त्रे प्रशाळा विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.**